सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तेरा दिनांक :- १५ ऑक्टोबर, २०२२

## प्रसिध्दीपत्रक

विषय :- दिव्यांग व्यक्ती लिहिण्याकरीता सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.** आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिराती/अधिसूचनेस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह pre-examination@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | जाहिरात क्रमांक | परीक्षेचा दिनांक | विनंती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा – २०२२ | ०७७/२०२२ | ५ नोव्हेंबर, २०२२ | २५ ऑक्टोबर, २०२२ |
| २ | सहायक नगररचनाकार, श्रेणी-१, गट- ब, नगर रचना व मुल्य निर्धारण संचालनालय | ००५/२०२२ | २० नोव्हेंबर, २०२२ | १ नोव्हेंबर, २०२२ |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२२ | ०८६/२०२२ | १० डिसेंबर, २०२२ | |
| ४ | महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२ | ०८७/२०२२ | १७ डिसेंबर, २०२२ | |

**३.** ज्या उमेदवारांनी यापूर्वीच विषयांकित परीक्षेसाठी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह सादर केला आहे, अशा उमेदवारांनी परत विनंती अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

**४.** केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई